# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

### शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५/ फाल्गुन ३०, १९४६ (शके)

**४२.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, मा.सदस्यांकडून सादर करण्यात येणारे विविध प्रस्ताव जसे की, म.वि.प. नियम २५९ व २६० अन्वये प्रस्ताव, म.वि.प. नियम ९२ अन्वये (सर्वसाधारण अर्धा-तास चर्चा), म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना तसेच म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा, म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना, म.वि.प. नियम १०१ अ अन्वये विशेष उल्लेख सूचना, म.वि.प.नियम १०२ अन्वये अशासकीय ठराव तसेच औचित्याचे मुद्दे इत्यादी संसदीय आयुधांमार्फत संगणकीय पध्दतीने (ऑनलाईन) सादर करण्यात येतात. अशा आयुधांमार्फत सादर करण्यात आलेल्या सूचना या अनेक विभागांशी व विषयांशी संबंधित असतात. त्याचप्रमाणे अनेकदा त्याचे प्रारुप लांबलचक व अनेक विभागांचा समावेश असलेले असल्यामुळे संबंधित विषयाला न्याय मिळत नाही.

विविध आयुधांवर सूचना देताना त्या संक्षिप्त, नेमक्या व मुद्देसूद स्वरुपाच्या असाव्यात, प्रस्तावातील प्रारुप एक किंवा दोन विभागांशी संबंधित असावे जेणेकरुन मंत्री महोदयांना सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर मुद्देसूद उत्तर देता येईल. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने संबंधित विभागाला देखील उपस्थित झालेल्या मुद्यांवर विवक्षितपणे कार्यवाही करता येईल.

सदरच्या बाबी विचारात घेता, आता यापुढे सादर करण्यात येणाऱ्या **विविध संसदीय आयुधांवरील प्रारुप नेमके, वस्तुस्थितीदर्शक, सुस्पष्टपणे नमूद करुन संबंधित विभाग स्पष्टपणे नमूद करावा. लांबलचक, व्यापक किंवा आरोपात्मक प्रारुप आढळल्यास त्यात योग्य त्या सुधारणा करुन अशा प्रारुपास मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अधिकारात अंतिम करण्यात येईल, असे सूचित करण्यात येत आहे.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २१ मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

**कृ.मा.प.**

**याची प्रत माहितीस्तव :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य

२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव

३) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

५) सचिव (१)(कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

६) सचिव (२)(कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय

७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी

८) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

१०) संगणक कक्ष (संकेतस्थळ)

११) एम.के.सी.एल.कक्ष (आज्ञावली)